MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १४ अंक : २ पाने : ८ ■ फेब्रुवारी-मार्च २०२०
E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

कोरोना विषाणूमुळे संपूर्ण जग लॉकडाऊन झाले आहे. त्यामुळे आज बहुतांश जगाचा कारभार ठप्प होऊन बसला आहे. भारतातही तीच परिस्थिती कायम आहे. या प्रकारचे साथीचे रोग जगात यापूर्वीही आले होते. परंतु, ज्या प्रमाणात कोरोना विषाणूचा संसर्ग धोकादायक होत आहे, त्या प्रमाणात यापूर्वी कधीही मनुष्याला या प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागले नव्हते. जागतिक आरोग्य संघटनेने पुढाकार घेऊन याबाबत संपूर्ण जगास दक्षतेचे आणि योग्य ती खबरदारी घेण्याबाबतचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

- **वीजपुरवठा कायम अखंडित ठेवा**
- **दक्षता व खबरदारी घ्या**
- **सूचनांचे काटेकोर पालन करा**
- **काळजी घ्या, सुरक्षित रहा**

भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या असलेल्या या देशाला कोरोना विषाणूंमुळे विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. येथील आरोग्यासंबंधी असलेल्या मुलभूत सुविधेवर आणखी भर द्यावा लागणार आहे. शहरांमध्ये असलेली लोकसंख्येची घनता, निरक्षरता आणि दारिद्रयता यासारख्या अनेक बाबींमुळे या विषाणूविरोधात लढण्यासाठी देशांसमोर फार मोठे आव्हान उभे राहिले आहे.

या कोरोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा उपाय नक्कीच यशस्वी ठरत आहे. परंतु, हे करीत असताना सर्वसामान्य नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यासाठी शासन व प्रशासनाला शर्थीचे प्रयत्न करावे लागत आहेत. त्यामुळे एक प्रकारे जैविक युध्दच सुरु झाले आहे. त्याचा मुकाबला करण्यासाठी सर्व नागरिक, शासन व प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी शासन व प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन सर्व नागरिक करीत आहेत.

नागरिकांना जीवन जगण्यासाठी आज वीज व पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामधील विजक्षेत्रात आपण कार्यरत आहोत, याचा मला अभिमान आहे. ही कोरोनाची लढाई सुरु झाल्यापासून ते आजपर्यंत आपण आपली यंत्रणा अखंडित व अविरतणपणे सुरुच ठेवली आहे.

अन्य राज्यातील लोक महाराष्ट्रात आपल्या चरितार्थासाठी मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. तसेच अनेक राज्यांसोबत महाराष्ट्राचा असलेला संपर्क व व्यवहारामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये या विषाणूच्या बाधितांची संख्या जास्त आहे. त्यामुळे आरोग्ययंत्रणेवर फार मोठा ताण आहे. साहजिकच, आरोग्य यंत्रणेसमोर ते एक मोठे आव्हान आहे. महापारेषणमधील माझ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठी जोखीम घेऊन संपूर्ण यंत्रणा लोकांकरिता अखंडित व अविरतपणे ठेवली आहे. त्याबाबत शासन, प्रशासनातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मला सार्थ अभिमान वाटतो.

मला आठवते, ५ एप्रिलला नागरिकांनी रात्री ९ वाजून ९ मिनिटाला संपूर्ण देशामध्ये दिवे बंद केले. तसेच दीपप्रज्वलन करून या लढाईमध्ये आपण सर्व एकजुटीने लढा देत आहोत, असे दाखवून दिले. मात्र, हे करत असताना संपूर्ण ग्रीडला अखंडित ठेवण्याची जबाबदारी माझ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. विशेष म्हणजे, त्यांनी डोळ्यात तेल घालून काटेकोर नियोजन करून ती पाळली. त्यामुळे यंत्रणा सुस्थितीत, अखंडित ठेवण्यास आपण यशस्वी ठरलो.

फक्त या प्रकारेच नाही तर अनेक प्रकारे आपण कामाच्या माध्यमातून शासनाला मदत करीत आहोत. सामाजिक जबाबदारी म्हणून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा पगार, धान्यसामुग्री व आर्थिक निधी देऊन आपण कोरोनाच्या विरोधात लढण्यासाठी शासनासोबत व स्वयंसेवी संस्थेला मदत करीत आहोत. कोरोनाच्या विरोधात लढण्यासाठी सर्व जनता घरी सुरक्षित असताना माझे अधिकारी व कर्मचारी घराबाहेर पडून त्यांचे



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कर्तव्य पार पाडत आहेत. आज अखंडित वीजपुरवठ्यामुळेच देशातील जनता सुसह्य जीवन जगत आहे. तसेच विजेमुळेच बहुतांश कामे Work From Home करणे शक्य झाली आहेत.

आज मी शासन व प्रशासनाच्या संपूर्ण यंत्रणेला धन्यवाद देऊ इच्छितो की, ते आपल्या सर्वांची काळजी घेत आहे. मला आशा आहे की, हा लॉकडाऊन लवकरच संपुष्टात येऊन आपण आपले पूर्ववत मानवी जीवन सुरु ठेवण्यास यशस्वी ठरु.

आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने आपण या कोरोना विषाणूवर मात करण्यासाठी औषध किंवा लस उपलब्ध करण्यासाठी आपले वैद्यकीय क्षेत्र यशस्वी ठरेल, अशी मी आशा बाळगतो. या लढाईमध्ये आपण ज्या पध्दतीने कर्तव्य बजावत आहात, याची नोंद पुढील पिढी घेईल. भविष्यातही अशीच चांगली कामगिरी आपण कराल, असा विश्वास वाटतो. सर्वांचे पुन्हा एकदा मन:पूर्वक अभिनंदन व आभार.

**शुभेच्छांसह..!**

**– दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



कौतुकाची थाप

■ ऊर्जामंत्र्यांनी केले वीज अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कौतुक ■

# अखंडित वीजपुरवठ्यामुळेच जनतेला घरात थांबवणे झाले शक्य : डॉ. नितीन राऊत

■ *टीम महापारेषण/महावितरण/महानिर्मिती, मुंबई*

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रयत्न करणारे डॉक्टर्स, नर्सेस,पोलीस कर्मचारी व प्रशासनाचे नागरिकांकडून कौतुक होत असताना, वीज पुरवठा करणारे वीज क्षेत्रातील अभियंते, तांत्रिक-अतांत्रिक कर्मचारी व अधिकारी यांचेही योगदान प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे, असे मत ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी व्यक्त केले.

वीज कंपन्यांनी अखंडित वीजपुरवठा केल्यामुळेच जनतेला घरात थांबविणे सरकारला शक्य झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या कामगिरीबद्दल ऊर्जामंत्र्यांनी महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तोंडभरुन कौतुक करत वीज कर्मचारी प्रत्येक आव्हान पेलण्यासाठी सक्षम असल्याचे म्हटले आहे.

विजक्षेत्रात वीजपुरवठा सुरळीत ठेवणारे कर्मचारी हे रोजच जोखीम पत्करून वीजपुरवठा सुरळीत ठेवतात.



बऱ्याच वेळी वीज अपघाताला त्यांना सामोरे जावे लागते. अपघातामुळे जीव जाणे व अपंगत्व येण्याचा घटना घडत असतात. आपल्या घरातील वीज गेली की, आपण अस्वस्थ होतो. परंतु वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र, ऊन-पाऊस व थंडीत विद्युत खांबावर चढून काम करणे सोपे नाही. कोरोनाच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी आपण सगळे आज घरात बसले आहोत. परंतु याचवेळी घराबाहेर येऊन वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम किती जोखमीचे आहे, याची जाणीव त्यांना असल्याचे डॉ. राऊत यांनी म्हटले आहे.

कामासाठी कार्यालयात जाता येत नसल्याने वर्क फ्रॉम होमसाठी वीजपुरवठा सुरळीत ठेवणे गरजेचे आहे. तो सुरळीत ठेवण्यासाठी महापारेषण व महावितरण विशेष खबरदारी घेत आहेत.

गरजेनुसार विजेचे उत्पादन करण्यासाठी महानिर्मितीच्या वेगवेगळ्या वीज निर्मिती केंद्रात अधिकारी, अभियंते व कामगार यांनी योग्य प्रकारचे नियोजन केले असून त्यानुसार विजेचे उत्पादन करण्यात येत आहे. विजकेंद्रातून निर्माण झालेल्या विजेचे पारेषण करून महावितरणच्या वीज उपकेंद्रापर्यंत पोहोचविण्याचे काम महापारेषणव्दारे उत्तमरीत्या पार पाडत असल्याने आज आपण घरबसल्या कामे करू शकतो, अशी भावना डॉ. राऊत यांनी व्यक्त केली.



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

जेजुरी-हिंजेवाडी दुहेरी परिपथ वाहिनी





अभिनव कल्पना

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांची संकल्पना ■

# कोराडीत साकारणार अभिनव ऊर्जा पार्क

■ टीम महापारेषण/टीम महानिर्मिती, नागपूर

कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा मंदिर विदर्भातील जागृत असे मंदिर असून दरवर्षी लाखो भाविक देवीच्या दर्शनाला येतात. भाविक तसेच पर्यटकांना वीज उत्पादन कसे होते? त्याची नेमकी प्रक्रिया कशी आहे? त्यामधील तंत्रज्ञानासोबतच विजेची बचत व महत्त्व याबाबत सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या संकल्पनेतून हा अभिनव ऊर्जा पार्क साकारणार आहे.

महानिर्मितीच्या वीज केंद्रांतून कोळशापासून औष्णिक वीज उत्पादन, पाण्यापासून जल विद्युत उत्पादन, सूर्य प्रकाशाद्वारे सौर ऊर्जा उत्पादन आणि गॅसच्या सहाय्याने वायू विद्युत उत्पादन कसे होते तसेच पवन ऊर्जा आणि ऊर्जेचे विविध स्त्रोत कोणते आहेत त्याचे आधुनिक मॉडेल आवश्यक माहितीसह या ठिकाणी ठेवण्यात येणार असल्याने हा ऊर्जा पार्क आगामी काळात नागपुरात येणाऱ्या देश-विदेशातील पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

ऊर्जा पार्कमध्ये वीज केंद्रातून तयार झालेल्या विजेचा प्रवास महापारेषण कंपनीच्या उंच मनोऱ्याद्वारे कसा होतो व त्यानंतर महावितरणच्या सब स्टेशनच्या माध्यमातून वीजग्राहकांना



घरापर्यंत वीज कशी पोहोचते, याचे आधुनिक मॉडेल या ठिकाणी प्रदर्शित करण्यात येणार असल्याने पारेषण आणि वितरण व्यवस्थेची तांत्रिक बाजू सोप्या शब्दात व सहज समजण्यास हातभार लागेल आणि पर्यायाने नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती होणार आहे.

ऊर्जा पार्कमध्ये कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे सुपर क्रिटीकल तंत्रज्ञानावर आधारित ३x६६० मेगॅवाट क्षमतेचे हुबेहूब मॉडेल प्रदर्शित करण्यात येणार असल्याने कोराडी येथे नेमकी कशी वीज निर्माण होते हे सर्वसामान्यांना पाहायला मिळणार आहे. वीज केंद्र हे संवेदनशील स्थळ असल्याने सामान्य नागरिकाला वीज केंद्रात सुरक्षात्मकदृष्ट्या प्रवेश मिळत नाही. त्यामुळे ऊर्जा पार्कच्या माध्यमातून ही सुविधा नागरिकांना उपलब्ध होईल, असे या प्रकल्पाचे शिल्पकार ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले.

महालक्ष्मी जगदंबा मंदिर परिसरात मुलांच्या खेळण्यासाठी नियोजित असलेल्या जागेत हा ऊर्जा पार्क साकारण्यात येणार आहे. नुकतेच महाविकास आघाडी सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात याची घोषणा राज्याचे वित्त व नियोजन मंत्री नामदार श्री. अजित पवार यांनी केली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला अंतिम रूप देण्यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. असीम गुप्ता, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्रीमती शैला ए., संचालक (खनिकर्म) श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (संचलन) श्री. चंद्रकांत थोटवे, मुख्य अभियंता (स्थापत्य) कोराडी श्री. अनंत देवतारे तसेच वास्तूविशारद श्री. अशोक मोखा हे प्रयत्नशील आहेत.



## प्रगतिपथावर असलेली कामे

बाळापूर-पारस वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी





बजेट

■ सौरकृषीपंपाव्दारे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होणार ■

# शेतकऱ्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*

२०२०-२०२१ चा अर्थसंकल्प हा महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांचा विचार करून त्यांना केंद्रस्थानी ठेवून तयार केला आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांना मदत केली नाही, मात्र महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांच्या हिताच्या घोषणा या अर्थसंकल्पात केल्या आहेत.

सौर कृषिपंप योजनेव्दारे कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी व्यक्त केली. गेल्या दोन वर्षांपासून उर्वरित महाराष्ट्रात शेतीपंपासाठी नवीन वीजजोडणी देणे बंद आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेतीपंपासाठी उर्वरित महाराष्ट्रात लघुदाब वीज वाहिन्यांवरून नवीन वीज जोडण्या देण्याची घोषणा यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. आशियाई विकास बँकेच्या सहकार्यातून ही योजना संपूर्ण राज्यात लागू करण्यात येणार आहे.



सौर कृषिपंप योजना पुढील पाच वर्षासाठी करण्यात आली असून या योजनाव्दारे प्रतिवर्ष एक लाख पाच हजार सौर कृषिपंप देण्यात येणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी ६७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कृषीपंपाना दिवसा कमीत-कमी चार तास वीज देण्याची घोषणा ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली आहे. सौरऊर्जेचा वापर करून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणे शक्य आहे. तसेच उद्योगांवर असलेला क्रॉस सबसिडीचा बोजाही यामुळे कमी होण्यास मदत होईल.

सध्या सरासरी वीजपुरवठा दर साडेसहा रुपये असून कृषिपंपाना एक रुपया ८८ पैसे या सवलतीच्या दराने वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र, यासाठी उद्योगांवर क्रॉस सबसिडी लावून तूट भरून काढली जाते. दिवसा मुबलक प्रमाणात वर्षभर स्वच्छ सूर्यप्रकाश उपलब्ध असल्यामुळे सौर वीजनिर्मिती करून कृषिपंपाची विजेची गरज भागविता येते.



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

बाभळेश्वर-कोपरगाव वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी



सामाजिक जबाबदारी

■ कोरोना संकट निवारणासाठी पुढाकार ■

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी महापारेषणकडून दीड कोटी रुपये जमा

■ *टीम महापारेषण, मुंबई*

*कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक मदतीसाठी केलेल्या आवाहनाला राज्यातील ऊर्जा विभागाच्या महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एका दिवसाचे वेतन सुमारे १ कोटी ५५ लाख ४३ हजार ३६१ रुपये देऊन प्रतिसाद दिल्याची माहिती महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी दिली.*

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

*या संदर्भातील पत्र महापारेषणकडून मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात येत असलेल्या उपाययोजनांसाठी आर्थिक अडचण येऊ नये, यासाठी ही मदत देण्यात येत असल्याचे महापारेषणने स्पष्ट केले आहे.*

*महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे म्हणाले, 'कोरोना' विषाणूमुळे निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीशी सामना करण्यासाठी सरकारकडून योग्य त्या उपाययोजना केल्या जात आहेत. महापारेषणकडूनही योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनीही महापारेषणच्या कामाचे जाहीर कौतुक केले आहे.*

*वीजपुरवठा अखंडित व चांगल्या क्षमतेने ठेवण्यासाठी कर्मचारी परिश्रम घेत आहेत. अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे, असेही श्री. दिनेश वाघमारे यांनीसांगितले.*

लढाई कोरोनाशी

■ कोरोना संकट निवारणासाठी युनियनचा पुढाकार ■

# स्वतंत्र मजदूर युनियनच्या वतीने १० लाखांची आर्थिक मदत

■ *टीम महापारेषण, नागपूर*

कोरोना संकटामुळे राज्यातील असंघटित कामगार व रोजंदारी कामगार यांना शासनातर्फे तात्काळ मदत प्राप्त करून देण्यासाठी स्वतंत्र मजदूर युनियन, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, मराविमं मागासवर्गीय वरिष्ठ अभियंता व अधिकारी संघटना, मागासवर्गीय विद्युत कर्मचारी कल्याण निधी मंडळ यांचेतर्फे १० लाखांचा धनादेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्याकडे जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी नागपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. रवींद्र ठाकरे, स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. जे. एस. पाटील, श्री. एन. बी. जारोंडे, श्री. धर्मेश फुसाटे, श्री. वाय. डी. मेश्राम आदी उपस्थित होते. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी स्वतंत्र मजदूर युनियनचे अभिनंदन केले.



नागपूर : कोरोना संकट निवारणासाठी स्वतंत्र मजदूर युनियन, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, मराविमं मागासवर्गीय वरिष्ठ अभियंता व अधिकारी संघटना, मागासवर्गीय विद्युत कर्मचारी कल्याण निधी मंडळ यांचेतर्फे १० लाखांचा धनादेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्याकडे सुपूर्द करताना युनियनचे अध्यक्ष श्री. जे. एस. पाटील, श्री. एन. बी. जारोंडे, श्री. धर्मेश फुसाटे, श्री. वाय. डी. मेश्राम आदी.



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

चाळीसगाव-पाचोरा वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी



Rest House

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# पुण्यातील गणेशखिंड येथील विश्रामगृहाचे थाटात उद्‌घाटन

■ *टीम महापारेषण, पुणे*

महापारेषण कंपनीचे अति उच्च दाब नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ, पुणे अंतर्गत गणेशखिंड येथे अद्ययावत व नवीन विश्रामगृहाचे उद्‌घाटन महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी केले.

याप्रसंगी सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंता (कंत्राटे व देखरेख) श्री. आर. एल. गायकवाड, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढे, महावितरणचे पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. सचिन तालेवार, अधीक्षक अभियंता (संवसु) श्री. संजीव भोळे, अउदा संवसु मंडळाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे, अउदा प्रकल्प मंडळ, पुण्याच्या अधीक्षक अभियंता श्रीमती चारुता बेंद्रे, चाचणी व दूरसंचारण मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. जयंत कुलकर्णी, अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडळ, पुणेचे अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. सतीश गायकवाड, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद घोलप यांच्यासह महापारेषण व महावितरणमधील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पुणे :** अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, पुणे अंतर्गत गणेशखिंड येथील अद्ययावत व नवीन विश्रामगृहाचे उद्‌घाटन महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी केले. याप्रसंगी सर्वश्री. आर. एल. गायकवाड, वंदनकुमार मेंढे, सचिन तालेवार, संजीव भोळे, जयंत कुलकर्णी, सतीश गायकवाड, मिलिंद घोलप व अन्य अधिकारी वर्ग.

गौरव मायबोलीचा

■ मराठी भाषा दिनी विविध कार्यक्रम ■

# नाशिक परिमंडळात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा




**नाशिक :** नाशिक परिमंडळात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पाणपोईचे उद्‌घाटन करताना नाशिक परिमंडळाचे मुखय अभियंता श्री. जयंत वीके. शेजारी अधिकारी व कर्मचारी वर्ग.

■ *टीम महापारेषण, नाशिक*

नाशिक परिमंडळात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मराठी भाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके उपस्थित होते. सुरूवातीला थोर मराठी साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांचा कार्य परिचय करून देण्यात आला. मातृभाषेची महती, मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान याबाबत अधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. म्हणी, वाक्यप्रचार, प्राचीन शब्द याबाबत रंजक खेळ घेऊन त्यांना उजाळा देण्यात आला. परिमंडळांतर्गत अधिकाऱ्यांनी थोर साहित्यिकांच्या तसेच स्वरचित कविता सादर केल्या. तसेच वि. वा. शिरवाडकर लिखित `कौत्येय` या नाटकातील एका प्रयोगाचे वाचन करण्यात आले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे फेब्रुवारी-मार्च २०२०

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | मंगेश मधुकर शिंदे | उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) | सांघिक कार्यालय | २०.०३.२०२० |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | अद्वैत व्यंकटेश देव | मुख्य अभियंता, पारेषण | सांघिक कार्यालय | २८.०२.२०२० |
| २. | प्रभाकर सुखदेव साळे | अधीक्षक अभियंता, पारेषण | सांघिक कार्यालय | २८.०२.२०२० |
| ३. | शरद जनार्दन लोखंडे | अधीक्षक अभियंता, स्थापत्य | अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, नाशिक | ३१.०३.२०२० |

jय शिवराय

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी सुरूवातीला संचालक (वित्त) (प्रभारी) श्री. अनिल कालेकर, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. मोतीसिंह चौहान, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी श्री. सुगत गमरे, श्री. अनिल कालेकर, श्री. संजय कुमार, श्री. अनंत पाटील यांनी `शिवरायांचे विचार` याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. महेंद्र वाकळे यांनी केले.



**प्रकाशगंगा इमारत :** सांघिक कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले. याप्रसंगी डावीकडून सर्वश्री. बी. एम. पाटील, भरत पाटील, महेंद्र वाकळे, अनंत पाटील, संजय कुमार, सुगत गमरे, अनिल कालेकर, सुधीर वानखेडे, मोतीसिंह चौहान.

पुस्तक प्रकाशन

■ जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम ■

# `कोठडीतील चांदणी` कथासंग्रहाचे थाटात प्रकाशन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महापारेषणच्या सांघिक कार्यालयातील उपव्यवस्थापक (मा.सं.) श्रीमती भारती लोकरे-कांबळे यांच्या `कोठडीतील चांदणी` या कथासंग्रहाचे प्रकाशन शालेय शिक्षणमंत्री श्रीमती वर्षाताई गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. जी. के. ऐनापुरे उपस्थित होते. प्रमुख वक्त्या सोमय्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती वीणा सानेकर उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, माजी खासदार श्री. एकनाथराव गायकवाड, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे माजी सदस्य सचिव श्री. किशोर मेढे, प्रा. डॉ. मोहन लोंढे, श्री. अरूण शेवते उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्रीमती वर्षाताई गायकवाड म्हणाल्या, ``ग्रामीण भागातील नवोदित लेखकांनी लिहिते राहिले पाहिजे. त्यांच्या साहित्य प्रकाशनासाठी योग्य ती मदत करण्यात येईल. महिलांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी साहित्याची गरज आहे.``

या कार्यक्रमाला महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य अभियंता श्री. श्रीराम भोपळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, माजी मुख्य अभियंता श्री. नागन्नाथ सोनकवडे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. महेंद्र वाकळे यांनी केले.



**मुंबई :** जागतिक महिला दिनानिमित्त श्रीमती भारती लोकरे-कांबळे यांच्या `कोठडीतील चांदणी` या कथासंग्रहाचे प्रकाशन करताना शालेय शिक्षणमंत्री श्रीमती वर्षाताई गायकवाड. शेजारी प्रा. जी. के. ऐनापुरे, डॉ. वीणा सानेकर, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, श्री. किशोर मेढे, प्रा. डॉ. मोहन लोंढे, श्री. अरूण शेवते, श्री. राजू गायकवाड, श्री. अनंत पाटील, श्री. श्रीराम भोपळे व अन्य मान्यवर.



# नाशिक परिमंडळात शिवजयंती साजरी

■ *टीम महापारेषण, नाशिक*

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती नाशिक परिमंडळात उत्साहात साजरी करण्यात आली. सुरूवातीला मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य श्री. विलास देशमुख यांचे `छत्रपती शिवाजी महाराज यांचे आचार, विचार आणि आपण` या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके उपस्थित होते. व्याख्यानानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सहजीवन



मनुष्य एक समाजशील प्राणी आहे. त्याचे अस्तित्व परस्परांवर अवलंबून आहे. मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, मानव हा सहजीवन पध्दतीवर अवलंबून असायचा. कोणत्याही क्षेत्रात मानव कार्यरत असला तरी तो सहजीवनापासून अलिप्त राहू शकत नाही.

सहजीवन असल्यामुळेच मानवाचे जीवन सुखकर झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे आपण जीवनात सर्वच गोष्टी करू शकत नाही, हे मान्य केले पाहिजे. त्याकरिता आपल्याला एकमेकांची मदत घ्यावी लागते. किंबहुना, त्या मदतीशिवाय मनुष्य जीवन सुखकर होणे अशक्य आहे, म्हणून माणूस हा परस्परांवर अवलंबून आहे. `एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' म्हणून तर म्हटले आहे. एकमेकांच्या मदतीमुळेच काम सुकर होते, हे सत्य आहे.

यामुळे जीवनप्रक्रियेची ती एक साखळीच आहे. त्याला आपण अर्थव्यवस्थाही म्हणू शकतो. या अर्थव्यवस्थेवर इतर सर्व व्यवस्था संलग्नित पर्यायाने अवलंबून असतात. उदा. समाजव्यवस्था, राजकीय व्यवस्था, कौटुंबिक व्यवस्था.

मात्र, काही अतिशय गंभीर परिस्थितीत ही अर्थव्यवस्था कोलमडू शकते. उदा. आणीबाणी, नैसर्गिक आपत्ती, जागतिक युध्द. त्यामुळे मानवाला अत्यंत गंभीर परिणामाला सामोरे जाऊ लागू शकते. जर का ही व्यवस्था कोलमडली तर त्यास पूर्ववत सुव्यवस्थेत आणण्यासाठी खूप मोठी मेहनत घ्यावी लागते.

असाच काहीसा अनुभव आपल्याला या कोरोना विषाणूमुळे अनुभवास मिळत आहे. आज कोरोना विषाणूच्या विरोधात लढण्यासाठी व उपाययोजनेसाठी अनेक देशांनी लॉकडाऊन केले आहे. फक्त महत्त्वाच्या व अत्यावश्यक सेवा सुरू ठेवून इतर सर्व सेवा पूर्णपणे बंद आहेत. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यांच्या स्वातंत्र्यावर एक प्रकारची गदा आली आहे. तसेच दैनंदिन अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागत आहे.

हे का होत आहे? कारण सहजीवनाची शृंखला तुटली आहे. कोरोना विषाणूला रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक खबरदारी म्हणून नागरिक घराबाहेर पडू शकत नाहीत. त्यामुळे जगण्यासाठी लागणाऱ्या अत्यावश्यक गोष्टीच फक्त नागरिक घेऊ शकत आहे. पर्यायाने, जीवनाचा आनंद त्यामुळे कमी होत आहे. याचा दूरगामी परिणाम एकंदरीत अर्थव्यवस्थेवर होत असताना आपण पाहतो आहे. यामुळे बऱ्याच उद्योग, व्यवसायांना फटका बसला आहे, हे नाकारून चालणार नाही.

म्हणूनच शासन व प्रशासन मिळून ही लॉकडाऊन व्यवस्था काढून मनुष्यजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. मात्र, या गोष्टीचा सखोल विचार केला असता आपल्याला कळते की, भारतासारख्या देशावर कोरोना विषाणूने निर्माण केलेल्या आव्हानास सामोरे जाण्यास लॉकडाऊन हा अतिशय महत्त्वाचा निर्णय आपल्या शासनाने घेतला आहे. नागरिकांचे आरोग्य व त्यांच्या संरक्षणासाठी फार धाडसी निर्णय सरकारने घेतला आहे. त्याचे सकारात्मक परिणामही आपण पाहत आहोत. त्यामुळे या कोरोना विषाणूचा फैलाव होण्यापासून अटकाव झाला आहे, हे मान्य करावेच लागेल.

संपूर्ण परिस्थितीचे अतिशय चांगल्या प्रकारे नियोजन व नियंत्रण शासन व प्रशासन पातळीवर होत आहे. त्याला सर्वसामान्य जनताही चांगला प्रतिसाद देत आहे. मात्र, दुसरीकडे सहजीवनाच्या प्रक्रियेस त्यामुळे खीळ पडली आहे. परंतु, ही परिस्थिती आटोक्यात आल्यावर पुन्हा एकदा किंबहुना अधिक जोमाने सहजीवन पध्दतीचा आनंद आपल्याला घेता येईल. तसेच अप्रत्यक्षरित्या आपली अर्थव्यवस्था पूर्वस्थितीत येण्यास मदत होईल, यात शंका नाही.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.

The Company accepts no responsibility for the matter published in the journal.